# बाबुजी आव्हाड महविद्यालयात स्पोर्ट्स फिटनेस अकॅडेमीचे उद्घाटन

**पाथर्डी । वीरभूमी –**

येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयात स्पोर्ट फिटनेस अकॅडेमिचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वसंत खेडकर सर, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विजय देशमुख, शाम नागरगोजे, प्रा. सचिन शिरसाठ, डॉ. बबन चौरे, प्रा. शेखर ससाणे, महेश काटे, सचिन वायकर व सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ. जी. पी. ढाकणे म्हणाले, फिटनेस अकॅडेमिचा उपयोग पाथर्डी तालुक्यातील मुलांनी करणे आवश्यक असून शास्त्रशुद्ध फिटनेस ट्रेनिंगमुळे मुलांचे आर्मी व पोलीस भरती होण्याचे स्वप्न साकार होणार



आहे. महाविद्यालयाच्या शारीरिक शिक्षण विभागात सुरु करण्यात आलेल्या या अकॅडमीमध्ये पोलीस व आर्मी भरती बरोबरच इतर खेळांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. एन. आय. एस. सर्टिफाईड ट्रेनर व क्रीडा शिक्षक शाम नागरगोजे यांनी विद्यार्थ्यांना शास्त्रशुद्ध ट्रेनिंग विषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाम नागरगोजे, सुत्रसंचालन प्रा. विजय देशमुख तर आभार महेश काटे यांनी मानले.